**तांत्रिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणा-या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना गुणवत्ता-नि-साधन आधारित (Merit cum Means based Scholarship) शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००७/(५४२/०७)/तांशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २७ जानेवारी, २००८.

संदर्भ : केंद्र शासनाचे अर्थसंकल्प कार्य मंत्रालय यांचे दिनांक २०.१२.२००७ चे पत्र.

**प्रस्तावना** : केंद्रिय अल्पसंख्यांक मंत्रालयाने देशातील अल्पसंख्यांक समाजातील गरीब तसेच गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना व्यावसायिक तसेच तांत्रिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्याची संधी प्राप्त व्हावी म्हणून गुणवत्ता-नि-साधनवर आधारित (Merit cum Means based Scholarship) शिष्यवृत्तीची योजना देशभरासाठी सुरु केली आहे. सदर योजना ही देशात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी असून त्याची अंमलबजावणी राज्य शासनाच्या एजन्सीद्वारे करणे अपेक्षित आहे. या योजनेसाठी संपूर्ण देशभरातील २०,००० लाभार्थींचा समावेश अपेक्षित असून त्यापैकी १,८४० एवढे लाभार्थी महाराष्ट्र राज्यासाठी विनिर्दिष्ट केले आहेत. यामध्ये मुस्लिम, शीख, बौध्द, पारसी आणि ख्रिश्चन समाजातील विद्यार्थ्यांचा अंतर्भाव असणार आहे. या योजनेसंबंधीची आवश्यक ती जाहिरात राज्य अल्पसंख्यांक आयोगाने दिनांक १.१०.२००७ रोजी दिलेली असून या संदर्भात लाभार्थ्यांकडून अर्जही प्राप्त झाले आहेत. राज्य शासनाने विहित केलेल्या निकषांस अनुसरुन त्यांची छाननी करुन लाभार्थींची संख्या निश्चित करुन लागणा-या रकमेची परिगणना करुन आवश्यक तो प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणे आवश्यक आहे. यासाठी तसेच सदरहू योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी कार्यपध्दती काय असावी, इत्यादी बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय** : अल्पसंख्यांक समाजातील गरीब आणि गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना व्यावसायिक तसेच तांत्रिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी गुणवत्ता-नि-साधन आधारित शिष्यवृत्ती (Merit cum means based scholarship) योजना शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून लागू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**योजनेची व्याप्ती** : भारतात शिक्षण घेण्यासाठी राज्य शासन/केंद्रशासित प्रशासनाने नेमलेल्या एजन्सीच्या माध्यमाने सदर शिष्यवृत्ती लाभार्थ्यांना उपलब्ध करुन देणे.

२. प्रस्तुत शिष्यवृत्ती योजनेच्या **अटी व शर्ती** खालीलप्रमाणे आहेत:-

(१) तांत्रिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमधील पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणे, विद्यार्थ्यांच्या लेख्यामध्ये परिरक्षण भत्ता जमा करणे. राज्य शासनाकडून अभ्यासक्रमाची फी संबंधित संस्थेकडे प्रत्यक्षात वर्ग करणे आवश्यक राहील.

(२) स्पर्धात्मक परीक्षेद्वारे तांत्रिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र ठरतील.

(३) जे विद्यार्थी स्पर्धात्मक परीक्षा न देता तांत्रिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम शिकत असतील तर ते विद्यार्थी देखील या योजनेमध्ये पात्र ठरु शकतील. तथापि, सदर विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक/पदवी परीक्षेमध्ये किमान ५० टक्के गुण प्राप्त करणे अपेक्षित राहील. विद्यार्थ्यांची निवड पूर्णत: गुणवत्तेवर (on merit basis) आधारित राहील.

(४) मागील वर्षाचा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाच सदरहू शिष्यवृत्ती योजना पुढे चालू ठेवता येईल.

(५) सदरहू योजनेतील लाभार्थ्याना अन्य शिष्यवृत्तीची योजना/स्टायपेंड योजनेचा लाभ घेता येणार नाही.

(६) अशा लाभार्थी विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २.५ लाखाच्या आत असणे आवश्यक राहील.

(७) या योजनेचे नोडल ऑफीसर यांनी योजनेची जाहिरात दरवर्षी ३० मार्च अखेरपर्यंत देणे आवश्यक असून संबंधित शैक्षणिक संस्थेमार्फत या योजनेसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज स्वीकृत करणे आवश्यक राहील.

(८) प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी केल्यानंतर या योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकरिता लागणा-या एकूण निधीचा अंदाज करुन विहित नमुन्यात राज्य शासन केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाकडे निधी वितरणासाठी अर्ज सादर करील. त्यामध्ये खालील बाबींचा तपशील राहील.

१) विद्यार्थ्यांचे नांव, २) कायमचा पत्ता, ३) दूरध्वनी क्रमांक, ४) अभ्यासक्रमाची वार्षिक फी,
५) संस्थेचे नाव आणि पत्ता, ६) विद्यार्थी वसतीगृहात रहात आहे किंवा कसे.

(९) याबाबतचा अर्ज राज्य शासनाकडून केंद्र शासनास दरवर्षी ३० सप्टेंबरपर्यंत पोहोचणे आवश्यक राहील.

(१०) (या संदर्भात राज्य शासनाने स्वतंत्र बँक खाते ठेवणे आवश्यक असून त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या निधीच्या नोंदी ठेवणे आवश्यक आहे.)

(११) मागील वर्षाच्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate) प्राप्त झाल्यानंतर केंद्रिय अल्पसंख्यांक आयोगाकडून निधी मुक्त केला जाईल. याबाबत केंद्रिय अल्पसंख्यांक मंत्रालयाकडून व मंत्रालयाकडून विहित केलेल्या एजन्सीमार्फत वार्षिक तपासणी केली जाईल.

(१२) या योजनेत ३० टक्के जागा मुलींसाठी राखून ठेवण्यात याव्यात.

(१३) एखाद्या अल्पसंख्यांक समाजातील मुलींची संख्या लाभार्थीमध्ये कमी असल्यास त्या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी त्या जागा समायोजित कराव्यात.

(१४) राज्यामध्ये जर एखाद्या विशिष्ट अल्पसंख्यांक समाजातील लाभार्थी कमी आढळल्यास रिक्त असलेल्या लाभार्थींची जागा इतर राज्यातील/केंद्रशासित प्रदेशातील त्याच अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरिता वापरण्यात येतील. राज्यात रहात असणा-या विद्यार्थ्यांना मग तो कुठेही शिक्षण घेत असला तरीही तो या योजनेसाठी पात्र ठरेल.

(१५) अल्पसंख्यांक समाजातील लोकांच्या संख्येनुसार सदरहू लाभार्थींची संख्या राज्यनिहाय निश्चित करण्यात आलेली असून नामांकित शैक्षणिक संस्थेमध्ये शिकत असणा-या विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे अर्ज सर्व प्रथम निकालात काढावेत. अशा संस्थांची यादी केंद्रिय अल्पसंख्यांक मंत्रालयाकडून उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

३. प्रस्तुत योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच राज्य शासन आणि केंद्र शासन यांच्या दरम्यान योजनेच्या कामकाजासंबंधी योग्य तो समन्वय साधून योजनेतील पात्र लाभार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त करुन देण्यासाठी त्याचप्रमाणे यासंबंधी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यासाठी नोडल ऑफीसरची आवश्यकता आहे. यासाठी डॉ. सु. का. महाजन, प्र. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची 'नोडल ऑफीसर' म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. सदर कामासाठी त्यांनी श्री. एन. बी. पाटील, प्रणाली विश्लेषक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची सेवा उपलब्ध करुन घ्यावी.

४. प्रस्तुत योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दत व नोडल ऑफिसरची कर्तव्ये व जबाबदा-या खालीलप्रमाणे राहतील.

(१) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार विहित नमुन्यात विहित वेळेच्या आंत दरवर्षी या योजनेची जाहिरात देऊन विहित नमुन्यात लाभार्थ्यांकडून अर्ज मागविणे आवश्यक आहे. याबाबतची कार्यवाही नोडल ऑफीसर यांनी करणे आवश्यक राहील. सद्यःस्थितीत प्राप्त झालेल्या अर्जांची तातडीने छाननी करुन लाभार्थींची संख्या निश्चित करुन त्यांना शिष्यवृत्तीपोटी येणा-या खर्चाची परिगणना करुन आवश्यक ती माहिती आणि प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यासाठी तातडीने उच्च व तंत्र शिक्षण विभागास सादर करावा.

(२) प्र. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी प्रस्तुत योजनेच्या कार्यान्वयनासाठी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित संगणक कक्ष निर्मितीसाठी लागणारा कर्मचारी वृंद, यंत्रसामुग्री, संगणक, प्रिंटर, फॅक्स मशिन, स्कॅनर, इत्यादी खरेदीकरिता लागणारा प्रशासकीय खर्च विचारात घेऊन आवश्यक ते अंदाजपत्रक शासनास सादर करावे.

(३) प्रस्तुत संगणक कक्षाकरिता कंत्राटी कर्मचा-यांची नियुक्ती तातडीने करणे आवश्यक आहे, त्यासाठीचा प्रस्ताव प्र. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी शासनास सादर करावा.

(४) संगणक कक्ष उभारणीकरिता लागणा-या निधीसाठी योग्य तो प्रस्ताव केंद्र शासनाच्या विहित प्रपत्रात प्र. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी शासनास सादर करावा.

(५) लाभार्थ्यांकडून प्राप्त होणा-या/झालेल्या अर्जांची या योजनेसंदर्भात केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाने विहित केलेल्या निकषानुसार छाननी करावी.

(६) तद्नंतर प्रत्यक्ष लाभार्थींची संख्या आणि शिष्यवृत्तीची रक्कम निश्चित करुन केंद्र शासनास सर्वसमावेशक प्रस्ताव पाठविण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही प्र. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी करावी.

(७) शिष्यवृत्तीचा दर खालीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | अर्थसहाय्याचा प्रकार | वसतीगृहात रहात असलेल्या विद्यार्थ्यांसाठी | वसतीगृहात रहात नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी |
|---|---|---|---|
| १ | परिरक्षण भत्ता (१० महिन्यांसाठी) | रु. १०,०००/- प्रतिवर्ष | रु. ५,०००/- प्रतिवर्ष |
| २ | अभ्यासक्रमाची फी | रु. २०,०००/- प्रतिवर्ष किंवा प्रत्यक्ष फी यापैकी जी कमी असेल ती. | रु. २०,०००/- प्रतिवर्ष किंवा प्रत्यक्ष फी यापैकी जी कमी असेल ती. |

(८) सदरहू योजनेच्या अंमलबजावणीची पूर्णतः जबाबदारी नोडल ऑफिसर म्हणून प्र. संचालक, तंत्रशिक्षण यांचीच राहील.

(९) सदरहू योजनेची अंमलबजावणी होण्याकरिता संचालक (उच्च शिक्षण), संचालक (तंत्र शिक्षण), आयुक्त (दुग्धविकास), संचालक (पशुसंवर्धन), संचालक (मत्स्यव्यवसाय), संचालक (कृषि) आणि संचालक (वैद्यकीय शिक्षण) यांनी आपल्या अधिपत्याखालील शैक्षणिक संस्थांना अवगत करावे.

(१०) या योजनेसंबंधी केंद्र शासनाचे सर्व निर्देश, अटी व शर्ती यांचे अनुपालन नोडल ऑफिसर यांनी करावे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळ www.maharashtra.govt.in वर ठेवण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८०२०११७१७४२००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(कांतीलाल उमाप)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
प्र.संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक (कृषि), कृषि संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
संचालक (शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व प्रशासकीय विभाग
निवडनस्ती/तांशि-१

C:\DOCUME~1\DIT\MYDOCU~1\Lole\GR\Minority Scholarship.doc